# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com


**महत्वाचे/ईमेलद्वारे**

क्रमांक : प्रनिप्रा/प्र.क्र.९०/प्रवेश-२०२०/पु.या./ १४९७ दिनांक : 01 OCT 2021

## परिपत्रक

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी.**
**पुनर्विलोकन याचिका**

**संदर्भ : मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक २(झ) मधील निर्देश.**

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्र अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी माहे मे-२०२१ ते ऑगस्ट २०२१ या कालावधीमध्ये झालेल्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आलेले आहेत, या संदर्भात मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक २(झ) मध्ये खालील प्रमाणे आदेश पारीत केलेले आहेत,-

"झ) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाच्या माहे मे-२०२१ ते ऑगस्ट २०२१ या कालावधीमध्ये बैठका झालेल्या असून सदरील बैठकींचे इतिवृत्त प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. सदरील इतिवृत्तांनुसार ज्या महाविद्यालयांतील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी हितसंबंधीत घटकांना पुर्नविलोकन याचिका (Review Application) सादर करण्याचे असल्यास संबंधीत महाविद्यालयास स्वतंत्ररित्या कळविल्यापासून दोन महिन्यांच्या आत आवश्यक माहिती व कागदपत्रांसह सादर करु शकतील, पुर्नविलोकन याचिका प्रक्रिया शुल्क रु. ५,०००/- रक्कमेचा धनाकर्ष 'THE SECRETARY, ADMISSIONS REGULATING AUTHORITY, MUMBAI' (Payble at Mumbai) या नावाने सादर करणे बंधनकारक राहील व हिच पध्दत पुढील पुर्नविलोकन याचिकेंसाठी लागू राहील."

प्रस्तूत प्रकरणी आपणास कळविण्यात येते की, प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या उक्त निर्णयानुसार आवश्यक कार्यवाही विहित कालावधीमध्ये करवी.

मा. प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशावरुन.

(चिंतामणी जोशी) भा.प्र.से.
**सचिव,**
**प्रवेश नियामक प्राधिकरण तथा**
**आयुक्त व सक्षम प्राधिकारी,**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई.**

प्रति,
१) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
२) संचालक, आयुष शिक्षण संचालनालय, मुंबई.
३) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.
४) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.
५) संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई.
६) संचालक/सदस्य सचिव, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन, पुणे.
७) अधिष्ठाता/प्राचार्य, व्यावसायिक अभ्यासक्रमाशी संबंधित महाविद्यालये.

प्रत माहितीकरिता अग्रेषित,-
१) प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) प्रधान सचिव, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत,
१) सर्व परिक्षा समन्वयक/सहाय्यक परिक्षा समन्वयक, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई.
२) परिक्षा सल्लागार, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई.
३) प्रशासकीय अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई.
४) मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक.
५) मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांचे स्वीय सहाय्यक.
४) प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयातील सर्व संबंधीत अधिकारी/कर्मचारी.